# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः31.03.2025** **वारःसोमवार**

---

1. देशासाठी अत्यंत कठीण काळ असतानाही नव्या सामाजिक चळवळींनी राष्ट्रीय चेतना जागृत ठेवली पंतप्रधानांचे गौरवोद्गार
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते छत्तीसगडमधे 33 हजार 7 शे कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी
3. देशभरात आज ईद-उल-फित्रचा उत्साह; पवित्र रमजान महिन्याची सांगता आज होणार
4. छत्तीसगडमधे 50 माओवाद्यांची पोलिसांसमोर शरणागती आणि
5. आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात आज लढत

**<u>मोदी नागपूर</u>**

देशासाठी अत्यंत कठीण काळ असतानाही इथल्या नव्या सामाजिक चळवळींनी राष्ट्रीय चेतना जागृत ठेवली, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. नागपूरमध्ये माधव नेत्रालयाच्या प्रीमियम सेंटरचं भूमिपूजन काल पंतप्रधानांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. गोरगरिबांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. माधव नेत्रालयानेही या कार्यात योगदान देत गेल्या तीन दशकांपासून लोकांच्या जीवनात प्रकाश आणण्याचं कार्य केलं असं मोदी म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा भारतीय संस्कृती आणि राष्ट्राच्या चेतनेला सातत्याने ऊर्जा देणारा; भारताच्या अमर संस्कृतीचा आधुनिक अक्षयवट असल्याचं सांगताना ज्याप्रमाणे संतांनी समाजाला नवी ऊर्जा देण्याचं काम केलं त्याचप्रमाणे डॉ हेडगेवार आणि गोळवलकर गुरुजी यांनीही समाजाला ऊर्जा दिल्याचं मोदी यावेळी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल छत्तीसगडमधील बिलासपूर जिल्ह्यातील मोहभट्टा येथे वीज, रस्ते, रेल्वे, तेल, वायू, शिक्षण आणि गृहनिर्माण या क्षेत्रांशी संबंधित 33 हजार 7 शे कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन, पायाभरणी केली. छत्तीसगडच्या नक्षलग्रस्त भागात कायमस्वरूपी शांततेचे एक नवे पर्व सुरू होत असल्याचं सांगताना राज्यातील दुर्गम आदिवासी भागात आरोग्य आणि इतर सुविधांसह रस्ते, वीज आणि मोबाईल सेवा या बरोबरच नक्षलग्रस्त भागात अनेक शाळा पुन्हा सुरू करण्यात आल्या असल्याचं मोदी यांनी यावेळी जाहीर सभेला संबोधित करताना सांगितलं. या कार्यक्रमादरम्यान, प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ग्रामीण भागातील 3 लाख लाभार्थ्यांचा गृहप्रवेशासाठी पंतप्रधानांनी घरांच्या चाव्या सुपूर्द केल्या.

**<u>ईद</u>**

देशभरात आज ईद-उल-फित्रचा उत्साह आहे. मुस्लीम धर्मियांच्या पवित्र रमजान महिन्याची सांगता ईदच्या दिवशी होते. रमजान ईदनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. यानिमित्त दिल्लीत जामा मस्जिद, फतेहपुरी मस्जिद आणि शाही ईदगाह इथं नमाज अदा केली जाणार आहे.

हा सण बंधुता, सहकार्य आणि करुणेच्या भावनेला बळकटी देतो असं सांगताना राष्ट्रपतींनी आशा व्यक्त केली की हा सण सर्वांना शांती, प्रगती आणि आनंद देईल. उपराष्ट्रपती जगदीप धनखड म्हणाले की ईद सांस्कृतिक विविधतेतून मिळालेल्या शक्तीमधून एकत्र बांधून राष्ट्राला पुढे नेण्यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या मूल्यांशी पुन्हा वचनबद्ध होण्यास हा सण प्रेरित करेल.

**माओवादी**

छत्तीसगडमधल्या बिजापूर जिल्ह्यातल्या 50 माओवाद्यांनी काल पोलिसांसमोर शरणागती पत्करली. यात प्रत्येकी 68 लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या 14 नक्षलवाद्यांचा समावेश असल्याचं पोलिसांनी सांगितलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी एकाच वेळी 50 माओवाद्यांनी शरणागती पत्करल्याबद्दल समाधान व्यक्त केल. शस्त्र खाली ठेऊन हिंसाचाराचा मार्ग सोडतील त्यांच सर्वांगीण पुनर्वसन करण्याच सरकारचं धोरण असून पुढील वर्षी 31 मार्चपर्यन्त देशातील नक्षलवादाचं समूळ उच्चाटन करण्याचं सरकारचं लक्ष्य असल्याचा पुनरुच्चार अमित शहा यांनी केला.

सैन्य आणि प्रशासनानं दुर्गम खेड्यात केलेल्या सुविधांमुळे प्रभावित होऊन या नक्षलींनी आत्मसर्पण केल्याचं पोलीस अधीक्षकांनी सांगितलं. शरणागती पत्करलेल्या प्रत्येकाला राज्यसरकारच्या पुनर्वसन धोरणानुसार 25 हजारांची तत्काळ मदत यावेळी देण्यात आली. बस्तरसारख्या दुर्गम भागात शिक्षण आणि आरोग्य सुविधा वाढवण्याचा सरकार प्रयत्न करत असून जे माओवादी हिंसेचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात सामील होतील त्यांच सरकार सर्वार्थाने पुनर्वसन करायला तयार असल्याचं मुख्यमंत्री विष्णु देव साई यांनी म्हटलं आहे.

**अफस्पा**

आसाम सरकारने दिब्रुगढ जिल्ह्यात 31 मार्च 2025 नंतर सशस्त्र दलाच्या विशेष अधिकार कायद्याची मुदत न वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीत सुधारणा झाल्यामुळे, दिब्रुगढ जिल्ह्यात 'अशांत क्षेत्र' हा दर्जा वाढविण्याची आवश्यकता नसल्याचं आसाम सरकारनं म्हटलं आहे. तथापि, राज्य सरकारने तिनसुकिया, चराईदेव आणि शिवसागर या तीन जिल्ह्यांमध्ये अफस्पा अंतर्गत 'अशांत क्षेत्र' दर्जा आणखी सहा महिन्यांसाठी सुरू ठेवण्याची शिफारस केली आहे.

दरम्यान गृह मंत्रालयाने मणिपूर, अरुणाचल प्रदेश आणि नागालँडच्या काही भागांमध्ये अफस्पाची मुदत उद्यापासून आणखी सहा महिन्यांसाठी वाढवण्याची घोषणा केली आहे. काल नागालँडमधील आठ जिल्हे आणि 21 पोलिस ठाण्यांमध्ये हा कायदा आणखी सहा महिन्यांसाठी वाढवला आहे. दिमापूर, निउलंड, चुमोकेदिमा, मोन आणि किफिरे यांना अशांत क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आल्याचं गृह मंत्रालयाने अधिसूचनेत म्हटलं आहे. अरुणाचल प्रदेशातील तिरप, चांगलांग आणि लोंगडिंग जिल्ह्यांमध्ये आणि 3 पोलिस ठाण्यांच्या क्षेत्रातही याची मुदत वाढवण्यात आली असून उद्यापासून 13 पोलिस ठाण्यांच्या अधिकारक्षेत्राशिवाय संपूर्ण मणिपूरमध्ये अफस्पा वाढवण्यात आला आहे.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. राष्ट्रपती आज संध्याकाळी शहरात पोहोचतील. उद्या मुंबईत होणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या 90 व्या वर्धापन दिन सोहळ्याच्या समारोप समारंभाला राष्ट्रपती उपस्थित राहतील.

**भूकंप**

म्यानमाचा भूकंप हा उच्चस्तरीय आणीबाणीचा विषय असून पुढील 30 दिवसांत जीव वाचवण्यासाठी आणि रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी त्यांनी तातडीने 8 दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची मागणी केली असल्याचं जागतिक आरोग्य संघटनेने म्हटलं आहे. शुक्रवारी मध्य म्यानमाच्या मंडाले शहराजवळ 7.7 रिख्टर तीव्रतेचा पहिला भूकंप झाला. या भूकंपामुळे म्यानमामध्ये 1700 हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे आणि थायलंडमध्ये किमान 18 जणांचा मृत्यू झाला आहे.

**<u>ट्रम्प</u>**

इराणने त्यांच्या अणुकार्यक्रमावर सहमती दर्शविली नाही तर त्यांना लष्करी परिणामांसह अतिरिक्त कर द्यावा लागेल, असे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. एनबीसी या वृत्तवाहिनीशी बोलताना ट्रम्प यानी सांगितलं की, अमेरिका आणि इराणचे अधिकारी यांसह विविध मुद्यांवर चर्चा करत आहेत. ट्रम्प यांनी त्यांच्या पहिल्या कार्यकाळात इराण आणि इतर प्रमुख देशांमधील 2015 च्या करारातून अमेरिकेला वगळले होते. ज्यामध्ये निर्बंध कमी करण्याच्या बदल्यात तेहरानच्या वादग्रस्त अणुकार्यांवर कठोर मर्यादा घालण्यात आल्या होत्या. इराणने युरेनियम समृद्धीकरणाच्या मर्यादा ओलांडल्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने इराणवर पुन्हा व्यापक निर्बंध लादले आहेत. पाश्चात्य देशांचा आरोप आहे की इराण त्यांच्या नागरी अणुऊर्जा कार्यक्रमाशी विसंगत असलेल्या समृद्ध युरेनियमचा वापर करून अण्वस्त्र क्षमता विकसित करत आहे. तर दुसरीकडे हा अणुकार्यक्रम केवळ उर्जेच्या उद्देशाने राबवत असल्याचं इराणने म्हटलं आहे.

**<u>ट्रम्पुतीन</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युक्रेनमधील सुरू असलेल्या युद्धाबद्दल रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प यांनी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याबद्दल पुतिन यांच्यावर टीका केली. रशिया युद्धबंदीला सहमत झाला नाही तर ते रशियन तेल खरेदी करणाऱ्या देशांवर 50 टक्क्यांपर्यंत शुल्क लादतील असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. तसच युद्ध सुरूच राहिल्यास अमेरिकेत प्रवेश करणाऱ्या रशियन तेल आणि इतर वस्तूंवर 25 टक्के शुल्क लावण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

**<u>वादळ</u>**

कॅनडातील ओंटारियोमध्ये बर्फवृष्टीमुळे लाखांहून अधिक लोकांना वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येचा सामना करावा लागत आहे. कॅनडा सरकारच्या पर्यावरण विभागाने ओटावा, क्यूबेक आणि ओंटारियोच्या काही भागात पाऊस आणि गडगडाटी वादळाचा इशारा दिलं आहे. उद्यापासून वीजपुरवठा पूर्ववत होण्याची अपेक्षा आहे. वादळामुळे ओंटारियोमधील ओरिलिया शहरात आपत्कालीन स्थिती जाहीर करण्यात आली आहे.

**<u>एनआयए</u>**

भारतात परत पाठवण्यात आलेल्या एका पीडितेची अमेरिकेत बेकायदेशीर तस्करी केल्याप्रकरणी राष्ट्रीय तपास संस्थेने काल एका गगनदीप सिंग याला अटक केली आहे. तपास संस्थेच्या म्हणण्यानुसार, गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये पीडितेची तस्करी करण्यात आली होती. पीडितेच्या तक्रारीनुसार आरोपीला बेकायदेशीर स्थलांतर प्रक्रियेसाठी अंदाजे 45 लाख रुपये दिले होते.

**<u>कुस्ती</u>**

जॉर्डनची राजधानी अम्मान इथं झालेल्या आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेच्या फ्रीस्टाइल प्रकारात दीपक पुनिया आणि उदित यांनी काल रौप्य पदके पटकावली. दिनेशने 125 किलो वजनी गटात तुर्कमेनिस्तानच्या झियामुहम्मत सपारोव्हला नमवत कांस्यपदक जिंकले. या स्पर्धेत भारताने दहा पदके जिंकली आहेत. यामध्ये एक सुवर्ण, तीन रौप्य आणि सहा कांस्यपदकांचा समावेश आहे.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल विशाखापट्टणम इथं झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं सनरायजर्स हैदराबादवर 7 गडी आणि 24 चेंडू राखून विजय मिळवला. तर राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्स या संघांदरम्यान झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं चेन्नई सुपर किंग्सचा 6 धावांनी पराभव केला. आज मुम,बीट वानखेडे मैदानावर मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात सामना होणार आहे.

**हवामान**

भारतीय हवामानशास्त्र विभागाने पुढील 4 दिवसांत महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये वादळ, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे. हवामान संस्थेने 1 ते 3 एप्रिल दरम्यान पश्चिम मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, केरळ, माहे, किनारी आंध्र प्रदेश, यानम, रायलसीमा, तेलंगणा आणि कर्नाटक येथेही अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता वर्तवली आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**